# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 209/2023 दिनांक : 28.05.2023**

## 1)खुनाचा प्रयत्न :—

**भोकर :—**दिनांक 26.05.2023 रोजी 20.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीच्या राहते घरा समोर भोकर ता.भोकर जि. नांदेड येथे,** यातील तिन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस व त्यांच्या मध्ये असलेल्या संडास बाथरूम बांधकामाच्या जुन्या वादाच्या कारणा वरून शिवीगाळ करून जिवे ठार मारण्याच्या उदेशने काठीने व कुराडीने डोक्यात मारून गंभीर जखमी केले आहे. व खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी शिवा मारोती रामगिरवार , वय 30 वर्षे, व्यवसाय खजगी नोकरी एनडीसी बँक रा. कोळगल्ली ता.भोकर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरन 191/**2023 कलम** 307, 323, 504,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोउपनि/**श्री.राम कराड, मो. नं. 9823714385** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :—

**लोहा :—** दिनांक 26.05.2023 रोजी चे 22.00 ते दि. 27.05.2023 चे 05.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरी चिखलभोसी ता.कंधार नांदेड येथे**, यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या घराचे आतुन लावलेला कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करून लोखंडी कपाटाचे दार तोडुन सामान अस्तव्यस्त टाकुन कपाटाचे आतील लॉकर तोडन लॉकर मधील सोन्या चांदीचे दागिने व नगदी असा एकुण किंमती 1,04,,000/—रूपयाचा माल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी शंकर देवराव रंडाळे, वय 48 वर्षे, व्यवसाय शेती रा. चिखलभोसी ता.कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरन 127/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/सोनकांबळे, मो.क्रं. 9823731311** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :—

**मुदखेड :—**दिनांक 26.05.2023 रोजी चे 16.00 वा. चे सुमारास, **रेल्वेस्टेशन मजिद जवळील सार्वजनिक रोडवर मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्याचे मित्र मोटार सायकलने जात असताना रेल्वेस्टेशन मजिद जवळील सार्वजनिक रोडवर यातील आरोपीतांनी गैरकायदयची मंडळी जमवुन फिर्यादीस मोटार सायकलची कट का मारलास या कारणा वरून संगनमत करून शिवीगाळ करून फिर्यादी व साक्षीदार यांना लाथाबुक्यानी मारहान केली व फिर्यादी व साक्षीदार निघुन जात असतांना त्यांचे वर दगड फेकुन दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी आविनाश साहेबराव मेटकर, वय 21 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. शिवाजीनगर मुदखेड जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरन 118/2023 कलम 326,143,147,149,324,427,506, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री अशोक अनंत्रे, मो. नं. 9518945033** हे करीत आहेत.

## 4)मोबाईल चोरी :—

**नांदेड ग्रामीण :—**दिनांक 27.05.2023 रोजी चे 02.00 ते 02.30 वा. चे दरम्यान, **प्लॉट नं डी 48 ओमादातार ड्रिकींग वॉटर कंपनी एम आय डी सी नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे पाण्याच्या कंपनीमध्ये मजुर झोपलेले असतांना कोणी तरी अज्ञात चोरटयाने किंमती 32,000/—रूपयाचा मोबाईल चोरून नेले. वगैरे **फिर्यादी बालाजीसिंह ओमप्रकाशसिंह ठाकुर, वय 42 वर्षे, व्यवसाय व्यापार रा.रवीनगर जुना कौठा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 373/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/2240 व्यवहारे, मो.क्र. 9823827173** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :—

**1)नांदेड ग्रामीण :—** 27.07.2022 रोजी ते दिनांक 15.01.2023 रोजी पर्यंत , **फिर्यादीचे सासरी खडकपुरा नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु माहेरहुन व्यवसाय टाकण्या साठी एक लाख रूपये व गाडी घेवुन ये म्हणुन शिवीगाळ करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ केला. व तु माहेरहुन पैसे घेवुन आली नाहीस तर तुला खतम करून टाकतो अशी जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 22 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 374/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/486 तेलंग, मो.क्रं. 9307865842** हे करीत आहेत.

**2)माळाकोळी :—** 27.05.2023 पर्यंत , **फिर्यादीचे सासरी व मौजे फुलमाळातांडा ता.लोहा फिर्यादीचे माहेरी ह.मु.हरीचंद्रतांडा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु माहेरहुन कार घेण्यासाठी चार लाख रूपये घेवून ये म्हणुन शिवीगाळ करून उपाशी पोटी ठेवुन तुला कामधंदा काही येत नाही म्हणुन शारिरीक व माणसीक छळ केला. व चारित्र्यावर संशय घेवुन घरातुन हाकलुन दिले.तु कार घेण्यासाठी पैसे घेवुन अली नाहीस तर तुला खतम करतो असे म्हणुन जिवे

मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 25 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरनं 64/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2308 राठोड, मो.क्रं. 9284536640** हे करीत आहेत.

**3) भाग्यनगर :–** 20.08.2023 रोजी 14.00 ते दिनांक 26.05.2023 रोजी 13.30 दरम्यान , **फिर्यादीचे सासरी मौजे नेरली ता. जि.नांदेड व काबरानगर नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस आरोपी क्रं 01 ते 03 यांनी तुझ्या आईने लग्नात काही एक सामान दिला नाही म्हणुन तु मला माझ्या आईच्या व वडिलाच्या उपचारा साठी 50,000/ रूपये माहेरहुन आणुन मला दे म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ करून उपाशी पोटी ठेवुन व आरोपी क्रं 04 ही आरोपी क्रं 01 यास नेहमी म्हणायची तु तिला सोडुल दे मी तुला दुसरी बायको करून देते, असे म्हणुन शारिरीक व माणसीक छळ केला. व आरोपी क्रं 05 तुला खतम करतो असे म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 21 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 199/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2150 माळवे, मो.क्रं.9970379878** हे करीत आहेत.

**4) कुंटुर :–** **दिनांक** 23.05.2017 ते दिनांक 26.05.2023 पावेतो , **मौजे कुष्णुर फिर्यादीचे राहते घरी व सासरी कुष्णुर ता. नायगाव जि.नांदेड येथे,** यातील नमुद 09 आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस उसाचे टोळी साठी माहेरहुन 1,40,000/ रूपये घेवुन ये म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ करून उपाशी पोटी ठेवुन पहिली पत्नी अतांना वर्षे गोपीचंद पवार हिचे सोबत दिनांक 21. 05.2023 रोजी दुसरे लग्न केले व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 21 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटुर** गुरनं 91/2023 कलम 498(अ),494 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1181 कुमरे, मो.क्रं.9637706877** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :–

**1) उस्माननगर :–** दिनांक 27.05.2023 रोजी 18.00 वा. चे सुमारास, **मौजे चिखली येथील अण्णाभाऊ साठे चौक जवळ प्लॉटमध्ये टिना पत्राचे रूम मध्ये ता.कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 9,800/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/566 रामेश्वर दिगंबर जायभाय,ने. पोस्टे उस्माननगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 78/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोहेकॉ/ **582 शिवपुजे, मो.नं. 8378989949** हे करीत आहेत.

**2)धर्माबाद :–** दिनांक 27.05.2023 रोजी 18.00 वा. चे सुमारास, **आरोपीचे राहते घरा समोर मोकळया जागेत शांतीनगर धर्माबाद ता.धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या शिंदी किंमती 1600/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/संतोष रामेश्वर घोसले,. ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धार्माबाद** गुरनं 116/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** सपोउपनि/**कारामुगे, मो.नं. 9823184089** हे करीत आहेत.

**3)उमरी :–** दिनांक 27.05.2023 रोजी 19.10 वा. चे सुमारास, **आरोपीचे शेतामध्ये शेलगाव शिवार ता.उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3360/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी नापोकॉ/सिदधार्थ शंकरराव केळकर ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धार्माबाद** गुरनं 132/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोहेकॉ/**938 बोडके, मो.नं. 9623658510** हे करीत आहेत.

**4)मुदखेड :–** दिनांक 27.05.2023 रोजी 18.00 वा. चे सुमारास, **आरोपीचे घराच्या शेजारी टिना पत्राचे ओपन शेडमध्ये दुर्गानगर मुदखेड जि.नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या सिंधी किंमती 2200/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/गंगाधर विठ्ठलराव कदम ने. पोस्टे स्थागुशा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 119/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोहेकॉ/ **231 फोले, मो.नं. 9623658510** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 210 / 2023 दिनांक : 28.05.2023

पोलीस अधिक्षक कार्यालयात **"स्वातंत्र्यविर सावरकर"** यां महापुषांची जयंती साजरी

28 मे, 2023 रविवार रोजी " **स्वातंत्र्यविर सावरकर**" या महापुरूषांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. **मा. श्री.श्रीकृष्ण कोकाटे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदशनाखाली **पोउपनि / घुले पोलीस नियंत्रण कक्ष नांदेड** यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी **श्री पोउपनि / मुपडे डायल 112** चे अधिकारी नांदेड, यांचेसह पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार मोठया संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन,मपोकॉ / शामका पवार, पोकॉ / विनांदे भंडारे यांनी उत्तम प्रकारे केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

